# महात्मा गांधी यांचे स्वच्छते विषयक विचार

**प्रा. डॉ. गणेश तुकाराम मोकासरे**
*समाजशास्त्र विभागप्रमुख,*
*सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव*

***प्रस्तावनाः***
*महात्मा गांधी हे स्वच्छतेचे पुजारी होते. त्यांनी आयुष्यभर स्वच्छतेचा पुरस्कार केला व इतरांनाही स्वच्छता पाळण्यासाठी प्रेरित केले. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी जो 14 कलमी कार्यक्रम हाती घेतला होता, त्या कार्यक्रमांमध्ये सुद्धा त्यांनी स्वच्छतेला अग्रक्रम दिलेला होता. गांधीजी हे स्वातंत्र्यापेक्षा स्वच्छतेला अधिक महत्त्व देत होते. म्हणून ते नेहमी म्हणत* "Sanitation is more important than independence." *आणि* "Sanitation is next to Godliness." *गांधीजींची शारीरिक, मानसिक पातळीवरील नैसर्गिक सकारात्मक आरोग्याची संकल्पना ही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यावरून गांधीजी हे स्वच्छतेला किती महत्त्व देत होते हे लक्षात येते.*

गांधीजी नेहमी म्हणायचे प्रत्येकाने स्वतःच सफाई कामगार व्हायला पाहिजे. त्यामुळे कुटुंबातील प्रत्येकाच्या वाट्याला सफाई कामाची विभागणी होईल आणि संपूर्ण कुटुंब व त्यांचे घर स्वच्छ राहील. घरातील लहान किंवा वृद्ध व्यक्तीने त्यांचे स्वतःचे बाथरूम टॉयलेट घराचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवला पाहिजे, ज्यामुळे वेगवेगळ्या आजारांपासून आपण दूर राहू शकू. बापूंचे सफाई विषयक विचार हे काही कोणत्या एखाद्या पुस्तकांमध्ये मिळत नाही, तर त्याच्या कर्मामध्ये त्याच्या वागण्यामध्ये बोलण्यामध्ये नेहमीच स्वच्छते विषयी विचार दिसून येत. त्यांनी प्रॅक्टिकल लाईफ मध्ये स्वतः स्वच्छता ठेवली, ते ज्या ज्या ठिकाणी जायचे धार्मिक स्थळे असतील गावांच्या भेटी असतील किंवा आंदोलनाचे ठिकाण असतील, या ठिकाणी ते स्वतःहून स्वच्छता करायचे आणि त्यामुळे त्यांचे अनुयायीसुद्धा स्वच्छतेचे नियम नेहमी पाळत असे. बापूंना कधीही त्यांचा परिसरात किंवा आजूबाजूला अस्वच्छता आवडत नसे, स्वच्छते विषयी त्यांचे विचार हरिजन, नवजीवन आणि यंग इंडिया यासारख्या साप्ताहिकांमध्ये नेहमी छापून येत असे. ते नेहमी म्हणत असे, 'I will not late anyone walk through my mind with their dirty feet.'

सर्वांसाठी संपूर्ण स्वच्छता हे महात्मा गांधीजीचे स्वप्न होते. त्यांच्यामते शारीरिक स्वास्थ्य आणि आरोग्यदायी पर्यावरण हे स्वच्छते शिवाय शक्य होणार नाही. प्रत्येकाने स्वच्छता साफसफाईचे ध्येय पुर्ण करण्यासाठी शिकले पाहिजे, त्यामुळेच आपण आजारांपासून दूर राहू शकतो. त्यांच्या मते भारत हा खेड्यांचा आणि वस्त्यांचा देश आहे. खेड्यांच्या आणि वस्त्यांच्या आजूबाजूला पाणी साचले नाही पाहिजे, ज्यामुळे डासांची पैदास होते. डासांची पैदा झाली की मलेरिया सारख्या भयंकर आजाराची साथ वाढते आणि अनेक लोक मृत्युमुखी पडतात. त्यामुळे आपल्या आजूबाजूला पाणी साचणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यायला पाहिजे.

महात्मा गांधीजी 24 मे 1925 च्या नवजीवन साप्ताहिकांमध्ये असे म्हणतात, मी पाश्चात्त्य राष्ट्राकडून स्वच्छते विषयी अधिक शिकलो पाश्चात्य देशांमध्ये त्यांचे टॉयलेट्स हे ड्रॉइंग रूम प्रमाणे स्वच्छ असतात. आपल्याकडे मलमूत्र विसर्जन हे व्यवस्थित पद्धतीने न केल्यामुळे त्याची पर्यावरणाला हानी होते. मी स्वतःमध्ये स्वच्छतेविषयी असे बदल करून घेतले आहे की, ते आता माझी इच्छा असून सुद्धा मी बदलू शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाने स्वच्छतेचे नियम हे काटेकोरपणे पाळले गेले पाहिजे. तसेच 13 सप्टेंबर 1925 च्या 'Our Durty Ways' या लेखामध्ये ते असे म्हणतात, "मलमूत्र विसर्जन हे एका निश्चित ठिकाणीच केले गेले पाहिजे. रस्त्यावर मूत्र वित्सर्जन करणाऱ्यास गुन्हा नोंदवला पाहिजे, एखाद्या ठिकाणी लघवी केल्यास त्यावर नंतर कोरडी माती टाकली पाहिजे. आपली स्वच्छालय नेहमी स्वच्छ ठेवली पाहिजे जेणेकरून त्यामुळे आपली बदनामी होणार नाही."

तसेच गांधीजी यांनी 1935 मध्ये 8 फेब्रुवारी हरिजन या साप्ताहिक मध्ये आपले विचार पुढील प्रमाणे मांडलेले आहेत, "गावातील तळे, टँक यांचा उपयोग कपडे धुण्यासाठी, आंघोळ करण्यासाठी, म्हशी धुण्यासाठी आणि तसेच पाणी पिण्यासाठी सुद्धा केला जातो. असा तळ्यांचा किंवा टँकच्या पाण्याचा गैरवापर हे एक प्रकारचे पाप आहेत आणि त्यामुळेच अनेक डिसेंटरी सारखे आजार

खेड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पसरतात. हाच त्याचा एक मोठा पुरावा आहे. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणच्या पाण्याची स्वच्छता राखणे हे प्रत्येक गावकऱ्यांचे कर्तव्य आहे. गांधीजी 1915 च्या हरिद्वार येथील कुंभमेळ्याला गेले होते, तेव्हा तेथील परिस्थिती बघून त्यांना खूप वाईट वाटले. त्यांनी बघितले की, पवित्र गंगा नदीमध्ये अनेक लोक आपले पाप नाहीसे करण्यासाठी डुबक्या घेत आहेत आणि तिला अस्वच्छ करत आहे. तसेच अनेक स्त्री पुरुष हे पवित्र गंगा नदीच्या काठावरच त्यांचा नैसर्गिक विधी करत आहेत. ज्यामुळे तेथे खूप अस्वच्छता पसरते. ज्या ठिकाणी लोक परमेश्वर प्राप्तीला जातात त्या ठिकाणीची इतकी वाईट परिस्थिती बघून त्यांना नैतिक व धार्मिक दृष्टिकोनातून खूप वाईट अनुभव आला.या कुंभमेळ्याच्या ठिकाणी महात्मा गांधीजींनी स्वतः त्यांच्या मित्राबरोबर भंग्याचे काम केले व साफस्वच्छता केली.

महात्मा गांधीजी हे पर्यावरण संरक्षणासाठी अत्यंत जागृत होते. लोकांनी सुद्धा जागरूक राहून आपली जबाबदारी स्वीकाराला पाहिजे असे त्यांचे मत होते. ते नेहमी म्हणायचे जोपर्यंत तुम्ही हातात झाडू आणि बकेट घेऊन निघत नाही तोपर्यंत तुमचे गाव आणि शहरे स्वच्छ होऊ शकत नाही. ते शाळा पाहायला जायचे तेव्हा शिक्षकांना म्हणत, पुस्तकातील शिक्षण देण्याबरोबरच मुलांना तुम्ही उत्तम स्वयंपाकी आणि उत्तम सफाई तज्ञ बनवाल तर तुमची संस्था आदर्श होईल. तसेच ते विद्यार्थ्यांना सल्ला देत असे तुम्ही स्वतःच तुमचे भंगी झाला तर तुम्ही तुमचा परिसर स्वच्छ ठेवाल. 'विक्टोरिया क्रॉस मिळवण्यापेक्षाही चांगला भंगी व्हायला जास्त धैर्य लागतं.'

एकदा गांधीजीच्या आश्रमाजवळील लोकांनी मलमूत्रावर माती टाकण्यास नकार दिला. तेव्हा ते त्या लोकांना म्हणाले, 'नक्कीच हे भंग्याचं काम आहे, मलाकडे पाहणं ही पाप आहे तर त्यावर माती टाकणं हे जास्तच पाप होईल.' गांधीजी खेड्यामधल्या सफाई कामावर स्वतः देखरेख करत त्यांना उदाहरण घालून देण्यासाठी ते काही महिने स्वतः हातात झाडू बादली घेऊन जात असे मित्र व पाहुण्यासोबत ते जात असे तेथील आजूबाजूचा कचरा मैला गोळा करत आणि तो खड्ड्यांमध्ये पुरून टाकत. गांधीजी हे केवळ बोलते समाज सुधारक नव्हते, तर ते प्रत्यक्ष त्यांच्या कार्यातून स्वच्छता करून लोकांना स्वच्छतेचा संदेश देत होते. अनेक वेळेला त्यांनी भंग्याच्या वस्तीमध्ये जाऊन त्यांची भेट घेतली व त्यांना समजून सांगितले की सफाई चे काम करणे हे काही कमीपणाचं काम नाही, उलट ते स्वच्छतेचे काम आहे आणि धैर्याचं काम आहे .तसेच ते भंग्यांना दारू पिणे व मांसाहार सोडून देण्याचाही उपदेश देत असे. सफाई कामगाराच्या संपाला त्यांनी कधीही पाठिंबा दिला नाही, कारण भंग्यांनी आपलं काम बंद ठेवलं तर अस्वच्छतेचा प्रश्न निर्माण होईल असे त्यांचे मत होते. गांधीजींना जेव्हा जेव्हा सफाई चे काम करण्याची संधी मिळत असे, त्यांना खूप आनंद होत असे. संडास किती स्वच्छ आहेत यावरून लोकांच्या स्वच्छतेची समज लक्षात येते असे ते म्हणत वयाच्या 76 व्या वर्षी सुद्धा ते अभिमानाने म्हणत, माझा संडास इतका स्वच्छ असतो की, त्यात तुम्हाला एकही डाग दिसणार नाही आणि दुर्गंधीही येणार नाही. मी स्वतःच माझा संडास साफ करतो.

एकदा एका परदेशी पाहुण्यांनी गांधीजीला विचारलं, तुम्हाला जर भारताचा एक दिवसापुरता व्हाईसरॉय केलं तर तुम्ही काय कराल? त्यावर गांधीजी शांतपणे म्हणाले, 'व्हाईसरॉयच्या घराजवळची भंगी वस्ती मी साफ करीन.' आणखी एक दिवस तुम्हाला दिला तर? तेच काम मी दुसऱ्या दिवशी करेल असे गांधीजींनी उत्तर दिले. यावरून त्यांच्या विचारातूनच नव्हे तर कृतीतून सुद्धा आपल्याला स्वच्छता दिसून येते. त्यांचे विचार फक्त शरीर स्वच्छ करणारे नव्हते, तर ते आत्मा स्वच्छ करणाऱ्या होते.

**संदर्भ:**

1. भागवत शोभा, (२००४). अनु., बहुरूप गांधी, कजा कजा प्रकाशन, पुणे.
2. https://www.emeacollege.ac.in/SSR-Documents/CRITERION%203/3.3.5%20Books/2018-19/3.3.5.Jisha.pdf
3. https://mgli.gujarat.gov.in/images/mahatma-gandhi/Gandhijiartical.pdf
4. हेडा ब्रिजमोहन, (२००६). अनु., "गांधीजींचे जीवन त्यांच्याच शब्दात", नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद.